SAMPLE CONTENT

CCE Pattern Perfect Notes

# इतिहास व नागरिकशास्त्र

प्रभावी संकल्पनांची उभारणी



इयत्ता सातवी


(मराठी माध्यम)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित.

## इयत्ता सातवी

# इतिहास व नागरिकशास्त्र




SAMPLE CONTENT

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 59382

**10800_11670_JUP**

# प्रस्तावना

नमस्कार बालमित्रांनो,

यंदा शिक्षण मंडळाने इयत्ता सातवीचा अभ्यासक्रम बदलला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतील. म्हणूनच, या नवीन अभ्यासक्रमाची कल्पकतेने ओळख करून देण्यासाठी **टार्गेट प्रकाशनाचे इयत्ता सातवी इतिहास व नागरिकशास्त्र** हे पुस्तक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.

यावर्षी इतिहासात मध्ययुगीन इतिहास व त्यातही मुख्यत्वे मराठेशाहीचा इतिहास अभ्यासायचा आहे. तर, नागरिकशास्त्रात भारतीय संविधानाची ओळख करून घेता येणार आहे. तेव्हा हा प्रेरणात्मक व मनोरंजक असा अभ्यास करायला तयार आहात ना?

टार्गेटच्या या पुस्तकाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक पाठाच्या प्रारंभी पाठात आलेल्या ऐतिहासिक संज्ञा किंवा पारिभाषिक संज्ञा तसेच, महत्त्वाचे शब्द यांचा अर्थ दिला आहे. इतिहास समजून घेताना या शब्द, संज्ञांचे संदर्भ लक्षात आल्यास विद्यार्थ्यांना उत्तम आकलन होईल. शक्य तेथे ऐतिहासिक घटनांचा क्रम दिला आहे, ज्यामुळे पाठाची समज व्यापक होईल. पाठाखालील प्रश्नांव्यतिरिक्त अनेक अधिकचे प्रश्न यात दिले आहेत जेणेकरून विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रश्नांचा सराव करता येईल. आकारिक मूल्यमापन विभागातील प्रश्नांची उत्तरेही समाविष्ट केली आहेत, सोबतच अनेक उपक्रमही सोडवून दिले आहेत. शक्य तेथे विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनार्थ निर्देश देण्यात आले आहेत.

पाठ्यपुस्तकात प्रत्येक पाठात 'करून पाहा', 'सांगा पाहू!', 'चला, चर्चा करूया' यांसारखे प्रश्न चौकटीत दिले आहेत. त्यांचीही उत्तरे टार्गेटच्या पुस्तकात समाविष्ट केली आहेत. आवश्यक तेथे ओघतक्ते, घटनाक्रम, तक्ते, चित्रे यांचा अंतर्भाव केला आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना मुद्दे लक्षात ठेवणे सोपे होईल. अभ्यासानंतर शेवटचा व महत्त्वाचा टप्पा असतो तो आपली तयारी जोखण्याचा. यासाठी प्रत्येक पाठाच्या शेवटी पाठाची संक्षिप्त उजळणी अंतर्भूत केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पाठानुसार सराव करणे शक्य होईल.

या वैशिष्ट्यांमुळे तुमचे विषयाचे आकलन व अभ्यासाची प्रक्रिया निश्चितच आनंददायी ठरेल. हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता: mail@targetpublications.org

*इतिहासासारखा दुसरा शिक्षक नाही!*

ज्ञानार्थींना खूप खूप शुभेच्छा!

प्रकाशक

---

प्रिय बालमित्रांनो,

तुमचे वैयक्तिक अनुभव आम्हांला कळवा आणि प्रसिद्धीचे मानकरी व्हा. या पुस्तकातील काही प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी स्व-अनुभवाने लिहिणे अपेक्षित आहे. अशा प्रश्नांची उत्तरे तुम्ही तुमच्या शब्दांत लिहून आम्हांला इ-मेल / पत्राद्वारे पाठवा.

त्यांपैकी आदर्श उत्तरे तुमच्या नावासहित आम्ही आमच्या आगामी आवृत्तीत प्रकाशित करू.

पुढील तपशील पाठवा: तुमचे नाव, पाठाचे नाव, प्रश्न आणि उत्तर वर उल्लेख केलेल्या इ-मेल पत्त्यावर किंवा कार्यालयीन पत्त्यावर पाठवा.

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| १. | इतिहासाची साधने | १ |
| २. | शिवपूर्वकालीन भारत | ९ |
| ३. | धार्मिक समन्वय | १७ |
| ४. | शिवपूर्वकालीन महाराष्ट्र | २३ |
| ५. | स्वराज्यस्थापना | ३२ |
| ६. | मुघलांशी संघर्ष | ३९ |
| ७. | स्वराज्याचा कारभार | ४६ |
| ८. | आदर्श राज्यकर्ता | ५३ |
| ९. | मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम | ६० |
| १० | मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार | ६९ |
| ११. | राष्ट्ररक्षक मराठे | ७५ |
| १२. | साम्राज्याची वाटचाल | ८३ |
| १३. | महाराष्ट्रातील समाजजीवन | ९० |
| | **नागरिकशास्त्र** | |
| १. | आपल्या संविधानाची ओळख | ९९ |
| २. | संविधानाची उद्देशिका | १०५ |
| ३. | संविधानाची वैशिष्ट्ये | १११ |
| ४. | मूलभूत हक्क भाग - १ | ११७ |
| ५. | मूलभूत हक्क भाग - २ | १२५ |
| ६. | मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये | १३० |


टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शविले आहेत.

SAMPLE CONTENT

# १. इतिहासाची साधने

**ऐतिहासिक संज्ञा:**

| | |
|---|---|
| इतिहासाची साधने | इतिहासाचे विश्वसनीय पुरावे. |
| भौतिक साधने | इतिहासाची सत्यता पटवून देणाऱ्या वस्तू, वास्तू किंवा त्यांचे अवशेष. |
| शिलालेख | दगडांवर किंवा भिंतींवर कोरलेले लेख. |
| ताम्रपट | तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख. |
| लिखित साधने | लिपींचा विकास झाल्यानंतर लिहिली गेलेली व ऐतिहासिक घटनांची माहिती देणारी साधने. |
| चरित्र | एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील घटनांची, दुसऱ्या व्यक्तीने लिहिलेली कालनिहाय माहिती. |
| तवारिख किंवा तारीख | विविध राज्यकर्त्यांची (प्रामुख्याने सुलतान व मुघल) पर्शियन भाषेत लिहिलेली कालनिहाय माहिती. |
| बखर | महाराष्ट्रात निर्माण झालेला इतिहास लेखनाचा एक प्रकार. |
| भूर्जपत्रे | भूर्ज झाडांच्या सालीपासून बनवलेले पान. प्राचीन काळी लिखाणासाठी या पानांचा वापर केला जाई. |
| मौखिक साधने | मौखिक परंपरेने पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेले लोकसाहित्य. |
| पोवाडा | एक मराठी काव्यप्रकार. पोवाडा म्हणजे शूर व्यक्तीच्या शौर्याचे आवेशयुक्त भाषेत केलेले निवेदन. |
| दंतकथा | ऐतिहासिक समजल्या जाणाऱ्या परंतु अधिकृत नसलेल्या, परंपरागत सांगितल्या जाणाऱ्या कथा. |
| मिथके | परंपरेने सांगितल्या जाणाऱ्या अशा कथा की ज्यामध्ये व्यक्तीच्या अद्‌भूत शक्तीची वर्णने किंवा प्रसंगांची वर्णने असतात. |

## संकलित मूल्यमापन

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. ............ साधनांमध्ये किल्ल्यांचे महत्त्वपूर्ण स्थान असते.

२. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या लेखांना ............ म्हणतात.

३. कवी परमानंद यांनी ............ भाषेत लिहिलेले 'श्री शिवभारत' हे शिवचरित्र आहे.

४. ऐतिहासिक साधनांचा तारतम्याने व ............ वापर करणे आवश्यक असते.

**उत्तर:** १. भौतिक   २. ताम्रपट

३. संस्कृत   ४. चिकित्सकपणे

SAMPLE TEXT

## योग्य जोड्या जुळवा.

१. 'अ'गटातील प्रकारांच्या 'ब'गटातील त्यांच्या साधनांशी योग्य जोड्या जुळवा.

| | 'अ'गट | | 'ब'गट |
|---|---|---|---|
| i. | भौतिक साधन | अ. | भूर्जपत्रे |
| ii. | मौखिक साधन | ब. | अवजारे |
| iii. | लिखित साधन | क. | दंतकथा |

**उत्तर:** (i – ब), (ii – क), (iii – अ)

## गटातील वेगळा शब्द शोधून लिहा.

*१. **भौतिक साधने, लिखित साधने, अलिखित साधने, मौखिक साधने.**

**उत्तर:** अलिखित साधने

**कारण:** इतर सर्व ऐतिहासिक साधनांचे प्रकार आहेत,तर अलिखित साधने हा साधन प्रकार नाही.

*२. **स्मारके, नाणी, लेणी, कथा.**

**उत्तर:** कथा

**कारण:** कथा ही मौखिक साधन आहे व इतर सर्व भौतिक साधने आहेत.

*३. **भूर्जपत्रे, मंदिरे, ग्रंथ, चित्रे.**

**उत्तर:** मंदिरे

**कारण:** मंदिर हे भौतिक साधन आहे, तर इतर सर्व लिखित साधने आहेत.

*४. **ओव्या, तवारिखा, कहाण्या, मिथके.**

**उत्तर:** तवारिखा

**कारण:** तवारिखा हे लिखित साधन आहे, तर इतर सर्व मौखिक साधने आहेत.

५. **अल्बेरुनी, झियाउद्दीन बर्नी, भीमसेन सक्सेना, कवी परमानंद.**

**उत्तर:** कवी परमानंद

**कारण:** इतर सर्व लेखकांनी इतिहास लेखनातील तवारिख प्रकारचे लेखन केले असून, कवी परमानंद यांनी इतिहास लेखनातील चरित्र प्रकारचे लेखन केले आहे.

## एका शब्दात उत्तरे लिहा.

१. **हैदरअलीच्या नाण्यांवरील प्रतिमा** –

२. **तंजावर येथील शिलालेख असलेले मंदिर** –

३. **तानाजींच्या पोवाड्याचा कर्ता** –

**उत्तर:** १. शिवपार्वती  २. बृहदीश्वर  ३. तुळशीदास शाहीर

SAMPLE CONTENT

## ओघतक्ता पूर्ण करा.

१.

किल्ल्यांचे प्रकार
- i
- ii
- iii
- iv

**उत्तर:** i. वनदुर्ग ii. जलदुर्ग iii. गिरिदुर्ग iv. भुईकोट

२.

मौखिक साधने
- मिथके
- गाथा
- कथा
- श्लोक
- i.
- ii.
- iii.
- iv.

**उत्तर:** i. लोकगीते ii. पोवाडे iii. म्हणी iv. अभंग

३.

ऐतिहासिक इमारती
- i.
- ii.
- iii.
- iv.

**उत्तर:** i. राजवाडे ii. मंत्रिनिवास iii. राणीवसा iv. जनतेची घरे

४.

स्मारकांचे तीन प्रकार
- i.
- ii.
- iii.

**उत्तर:** i. समाधी ii. कबर iii. वीरगळ

५.

इतिहासाचे घटक
- i.
- ii.
- iii.
- iv.

**उत्तर:** i. व्यक्ती ii. समाज iii. स्थळ iv. काळ

## लिहिते व्हा.

***१. स्मारकांमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो?**

**उत्तर:** स्मारकांमध्ये समाधी, कबर, वीरगळ यांचा समावेश होतो.

***२. तवारिख म्हणजे काय?**

**उत्तर:** तवारिख किंवा तारीख म्हणजे घटनाक्रम होय.

SAMPLE CONTENT

***३. इतिहासलेखनात लेखकाचे कोणते पैलू महत्त्वाचे असतात?**

**उत्तर:** इतिहासलेखनात लेखकाचा नि:पक्षपातीपणा आणि तटस्थता हे पैलू महत्त्वाचे असतात.

**४. पेशवेकालीन नाण्यांवर कोणत्या भाषेचा वापर होत असे?**

**उत्तर:** पेशवेकालीन नाण्यांवर अरेबिक किंवा पर्शियन भाषेचा वापर होत असे.

**५. 'बखर' या शब्दाचा अर्थ काय आहे?**

**उत्तर:** 'बखर' हा शब्द खबर या शब्दावरून आला असून, खबर म्हणजे बातमी होय.

## तुमचे मत लिहा.

***१. शिलालेख हा इतिहासलेखनाचा विश्वसनीय पुरावा मानला जातो.**

**उत्तर:** i. शिलालेख म्हणजे दगडांवर किंवा भिंतींवर कोरलेले लेख होय.

ii. शिलालेखांद्वारे तत्कालीन भाषा, लिपी, समाजजीवन यांविषयी माहिती मिळते.

iii. व्यक्ती, समाज, स्थळ आणि काळ हे इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे चार घटक आहेत.

iv. शिलालेखांद्वारे या चारही घटकांबद्दल विश्वसनीय माहिती आपल्याला मिळते.

म्हणून, शिलालेख हा इतिहासलेखनाचा विश्वसनीय पुरावा मानला जातो.

***२. मौखिक साधनांच्या आधारे लोकजीवनाचे विविध पैलू समजतात.**

**उत्तर:** i. मौखिक परंपरेने पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेले पोवाडे, गाथा, श्लोक, लोकगीते, अभंग इ. लोकसाहित्य हे मौखिक साधनांमध्ये येते.

ii. या साहित्याचा कर्ता अज्ञात असला तरी या साहित्याच्या पठणाने ते जतन केले जाते.

iii. या साधनांद्वारे त्या काळातील सामाजिक स्थिती, राजकीय संबंध, प्रशासकीय व्यवस्था यांबद्दल माहिती मिळते. उदा. तुळशीदास शाहीर यांचा 'तानाजीचा पोवाडा.' यामधून आपल्याला त्यावेळेचे राज्यकर्ते, राजकीय संबंध आणि ऐतिहासिक घटनेची माहिती मिळते.

iv. तसेच तत्कालीन धार्मिक, सांस्कृतिक जीवनाबद्दलही माहिती समजते.

अशाप्रकारे, मौखिक साधनांच्या आधारे लोकजीवनाचे विविध पैलू समजतात.

***३. ऐतिहासिक साधनांचे मूल्यमापन करणे आवश्यक असते का? तुमचे मत सांगा.**

**उत्तर:** i. इतिहास हा विश्वसनीय पुराव्यांवरच आधारित असावा लागतो.

ii. इतिहासाचा अभ्यास करताना ऐतिहासिक साधनांचा आधार घ्यावा लागतो.

iii. ऐतिहासिक साधनांची विश्वसनीयता तपासून पाहावी लागते.

iv. लेखकाचे व्यक्तिगत हितसंबंध, काळ, राजकीय दबाव यांचा प्रभावही या साधनांवर असू शकतो.

v. मिळालेली माहिती ऐकीव आहे, की लेखक स्वत: त्याचा साक्षीदार आहे हे पाहावे लागते.

vi. तसेच, लेखनातील अतिशयोक्ती, प्रतिमा, प्रतीके, अलंकार यांचाही विचार करावा लागतो.

vii. ऐतिहासिक साधनांद्वारे मिळालेली माहिती एकांगी, विसंगत किंवा अतिरंजित असण्याची शक्यता असू शकते.

म्हणून, ऐतिहासिक साधनांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

SAMPLE CONTENT

## नावे शोधून लिहा.

*१. **खालील चौकोनात दडलेली ऐतिहासिक साधनांची नावे शोधून लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ता | दं | थ | क | था | र्च |
| री | म्र | चि | त्रे | रि | च |
| ख | क | प | डे | लो | ख |
| ब | झो | श्लो | ट | क | लि |
| आ | पो | वा | डे | गी | ते |
| शि | ला | ले | ख | ते | र |

**उत्तर:**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ता | दं | त | क | था | र्च |
| री | म्र | चि | त्रे | रि | च |
| ख | क | प | डे | लो | ख |
| ब | झो | श्लो | ट | क | लि |
| आ | पो | वा | डे | गी | ते |
| शि | ला | ले | ख | ते | र |

i. ताम्रपट ii. दंतकथा iii. चित्रे
iv. तारीख v. बखरी vi. श्लोक
vii. कपडे viii. पोवाडे ix. शिलालेख
x. लोकगीत xi. चर्च xii. खलिते

## संकल्पना स्पष्ट करा.

*१. **भौतिक साधने**

**उत्तर:** i. ऐतिहासिक वस्तू आणि वास्तू किंवा त्यांचे अवशेष, यांना इतिहासाची 'भौतिक साधने' असे म्हणतात.

ii. भौतिक साधनांच्या अभ्यासातून त्या वस्तू / वास्तूच्या कालखंडाचा बोध होतो. त्यातून वास्तुकलेच्या पंगतीबद्दल माहिती मिळते.

iii. तसेच, त्या विशिष्ट काळातील आर्थिक स्थिती, कलेचा दर्जा, बांधकामाची शैली, लोकांचे राहणीमान यांच्याबद्दलही माहिती मिळते.

iv. भौतिक साधनांमध्ये किल्ले, स्मारके, इमारती, लेणी, शिलालेख, नाणी, ताम्रपट यांचा समावेश होतो. या साधनांमध्ये किल्ल्यांना फार महत्त्व आहे.

*२. **लिखित साधने**

**उत्तर:** i. लिपींचा विकास झाल्यानंतर लिहिली गेलेली व ऐतिहासिक माहिती देणारी साधने म्हणजे 'लिखित साधने' होय.

ii. याद्वारे आपल्याला महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांची माहिती, त्या काळातील खाण्या-पिण्याचे पदार्थ, लोकजीवन, वेशभूषा, आचार-विचार, सण-समारंभ यांची माहिती मिळते.

iii. तसेच, राजकीय धोरणे, प्रशासकीय व्यवस्था, राजकीय संबंध यांच्याबद्दलही माहिती मिळते.

iv. भुर्जपत्रे, पोथ्या, ग्रंथ, राजदरबारातील कामकाजाची कागदपत्रे, वंशावळी, शकावली, बखरी, तवारिख, प्रवासवर्णने, चरित्रे, पत्रव्यवहार इ. साधने लिखित प्रकारात येतात.

SAMPLE CONTENT

**३. मौखिक साधने**

**उत्तर:** i. मौखिक परंपरेने (पठणाने) पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होत राहिलेले लोकसाहित्य म्हणजे इतिहासाची मौखिक साधने होय.

ii. या साधनांमुळे आपल्याला लोकजीवनाबद्दल आणि त्यात होत गेलेल्या बदलांबद्दल माहिती मिळते.

iii. जात्यावरील ओव्या, लोकगीते, पोवाडे, कहाण्या, दंतकथा, मिथके, अभंग, गाथा, श्लोक, म्हणी इ. या साधन प्रकारात येतात.

## थोडक्यात उत्तरे लिहा.

**१. नाणी इतिहास कसा सांगतात?** (सांगा पाहू ! - पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १)

**उत्तर:** i. विविध राज्यकर्त्यांनी आपापल्या काळात सोने, चांदी, तांबे या धातूंपासून तयार केलेली नाणी इतिहासाची महत्त्वाची साधने आहेत.

ii. कारण, या नाण्यांवरील चित्रांवरून त्या विशिष्ट काळातील राज्यकर्ते, त्यांचा काळ, राज्यकारभार, धार्मिक संकल्पना, व्यक्तिगत तपशील इ. बाबींची माहिती मिळते.

iii. तसेच, त्या काळातील आर्थिक व्यवहार व आर्थिक स्थितीचीही माहिती मिळते. याचसोबत धातूशास्त्राची प्रगतीही कळते.

iv. नाण्यांवरील प्रतिमावरून त्या काळातील धार्मिक समन्वयाची कल्पना येते. उदा. सम्राट अकबराच्या नाण्यांवरील शिवपार्वतीच्या प्रतिमा.

v. इतकेच नव्हे, तर विशिष्ट काळातील भाषाव्यवहार समजण्यातही नाण्यांची मदत होते. उदा. पेशव्यांच्या नाण्यांवरील अरेबिक किंवा पर्शियन भाषा.

**२. लिखित साधने कशाप्रकारे इतिहास उलगडतात?**

**उत्तर:** i. ऐतिहासिक माहिती देणारी लेखी स्वरूपातील साधने म्हणजे इतिहासाची लिखित साधने होय.

ii. राजदरबारातील कामकाजाचे कागद,पत्रे, बखरी, तवारिखा, परदेशी प्रवाशांची प्रवासवर्णने, चरित्रे इ. लिखित साधने विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत.

iii. याद्वारे आपल्यास त्या काळातील लोकजीवन, वेशभूषा, आचार-विचार, खाण्या-पिण्याचे पदार्थ, सण-समारंभ इ. बद्दल माहिती मिळते.

iv. तसेच, राज्यकर्त्यांची चरित्रे, पत्रव्यवहार आपल्याला त्यांची धोरणे, प्रशासकीय व्यवस्था, राजकीय संबंध समजून घेण्यास साहाय्य करतात.

v. भाषेची जडणघडण, तत्कालीन, सांस्कृतिक जीवन, सामाजिक परिस्थिती या सगळ्यांबद्दल लिखित साधने माहिती देतात.

अशाप्रकारे, लिखित साधने इतिहास उलगडतात.

## आकारिक मूल्यमापन

**करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३)

**१. पोवाडे, आदिवासी गीते यांचा संग्रह करा व शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांचे सादरीकरण करा.**

(वरील उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करावेत.)

**ऐतिहासिक साधनांच्या जतनाचे उपाय सुचवा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४)

**उत्तर:** i. सामान्यत: सर्वसामान्य जनतेचा इतिहासाच्या भौतिक व मौखिक साधनांशी जास्त संपर्क येतो. त्यामुळे त्यांचे जतन करणे ही आपलीच जबाबदारी आहे.

ii. किल्ले, स्मारके, लेणी, ऐतिहासिक ठिकाणांना भेट देताना तिथे अस्वच्छता पसरणार नाही याची काळजी घ्यावी.

SAMPLE CONTENT

iii. तसेच तेथील भिंतींवर, दगडांवर आपली नावे लिहिणे/कोरणे असे अनुचित प्रकार करणे कटाक्षाने टाळावेत. कोणी तसे करताना दिसल्यास, त्यांस त्यापासून परावृत्त करावे.

iv. ऐतिहासिक साधनांचे जतन करणाऱ्या संस्थांच्या मोहिमांमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभाग घ्यावा.

v. मौखिक परंपरेतून मिळालेली माहिती, कथा, ओव्या, गाणी इ. लिहून त्यांचा संग्रह करावा.

**बोलते व्हा.**

**१. इतिहासाशी निगडित म्हणी व वाक्प्रचार शोधा आणि सांगा.**

**उत्तर: म्हण** – i. गड आला पण सिंह गेला. ii. आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे.

**वाक्प्रचार** – i. अटकेपार झेंडा लावणे. ii. संक्रांत येणे.

iii. खिंड लढवणे. iv. तोफेच्या तोंडी देणे.

v. पाडाव करणे.

## ओघतक्ता पूर्ण करा.

**१. खालील ऐतिहासिक साधनांचे भौतिक, लिखित व मौखिक साधने यांमध्ये वर्गीकरण करा.**

शस्त्रे, आदिवासी गीते, आज्ञापत्रे, कपडे, गाथा, खलिते, पोवाडे, किल्ले, ग्रंथ.

**उत्तर:**

| भौतिक साधने | लिखित साधने | मौखिक साधने |
|---|---|---|
| शस्त्रे | खलिते | गाथा |
| कपडे | आज्ञापत्र | पोवाडा |
| किल्ले | ग्रंथ | आदिवासी गीते |

**उपक्रम**

**१. कोणत्याही जवळच्या वस्तुसंग्रहालयास भेट द्या. तुम्ही अभ्यासत असलेल्या कालखंडातील इतिहासाच्या साधनांची माहिती मिळवा व त्यांची नोंद उपक्रमवहीत करा.**

(हा उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करावा.)

## पाठाची उजळणी

**१. रिकाम्या जागा भरा.**

i. ............ वर राजाज्ञा, निवाडे इत्यादी प्रकारची माहिती कोरलेली असे.

ii. ............ हा महाराष्ट्रात निर्माण झालेला इतिहासलेखनाचा एक प्रकार आहे.

iii. अंतर्गत ............ पाहून ऐतिहासिक साधनांचा दर्जा ठरवता येतो.

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

i. प्राचीन काळापासून कोणती नाणी प्रचलित होती?

ii. इतिहास या शब्दाचा अर्थ काय आहे?

iii. बखरीतून कोणत्या प्रकारची माहिती मिळते?

**३. टीप लिहा.**

i. इतिहासाच्या साधनांचे महत्त्व

SAMPLE CONTENT

**उत्तर:**

१. i. ताम्रपटां ii. बखर iii. प्रमाणके

२. i. प्राचीन काळापासून कबडी, दमडी, धेला, पैं, पैसा, आणा, रुपया ही नाणी प्रचलित होती.

ii. इतिहास या शब्दाचा अर्थ 'इति + ह + आस्' म्हणजे 'असे घडले' असा आहे.

iii. बखरीतून तत्कालीन राजकीय घडामोडी, सांस्कृतिक जीवन, भाषाव्यवहार, सामाजिक परिस्थिती यांची माहिती मिळते.

३. i. अ. इतिहास हा विश्वसनीय पुराव्यांवरच आधारित असावा लागतो व असे पुरावे इतिहासाच्या साधनांद्वारे पुरवले जातात.

ब. व्यक्ती, समाज, स्थळ व काळ हे इतिहासाचे महत्त्वाचे घटक असून, इतिहासाच्या साधनांद्वारेच या घटकांची माहिती मिळते.

क. इतिहासाची साधने - भौतिक, मौखिक, लिखित ही एकमेकांस पूरक असल्याने त्यांची सत्यता तपासणे शक्य होते व इतिहासलेखन अधिक शास्त्रशुद्ध होते.

ड. एकूणच, इतिहासाच्या साधनांद्वारे विविध काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनाबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळून इतिहास मांडता येतो.

SAMPLE CONTENT

# इयत्ता सातवी

## AVAILABLE SUBJECTS:




- My English Book
- हिंदी सुलभभारती
- मराठी बालभारती
- गणित
- सामान्य विज्ञान
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल

BUY NOW

## ठळक वैशिष्ट्ये:

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित
- पाठाखालील सर्व प्रश्नांचा समावेश तसेच सरावासाठी अधिक प्रश्नांचा समावेश
- विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी पाठाधारित विविध कृतींचा समावेश
- गणित, सामाजिक शास्त्रे व विज्ञानामध्ये स्वयंमूल्यमापनाकरता प्रत्येक पाठाची उजळणी समाविष्ट
- भाषा विषयांमध्ये सर्व पाठ व कवितांचे शब्दार्थ, सारांश व भावार्थ समाविष्ट

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15

mail@targetpublications.org

www.targetpublications.org